## भव्य मिरवणूक, चित्ररथ, ढोल-ताशा, लेझीम व शिवरायांच्या जयघोषात पनवेलमध्ये शिवजयंती मोठया उत्साहात साजरी

पनवेल(प्रतिनिधी) हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पनवेल नगर परिषदेच्यावतीने आयोजित करण्यात आलेला शिवजयंती सोहळा बुधवारी (दि.१९) मोठया उत्साहात भव्य मिरवणूक आणि चित्ररथ, ढोल-ताशा, लेझीम व शिवरायांच्या जयघोषात पार पडला.

शहरातील शिवाजी चौकातील पुर्णाकृती पुतळा येथे अभिवादन केल्यानंतर निघालेल्या या भव्य मिरवणूकीत आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर.सी.घरत, तहसिलदार पवन चांडक, नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, आ.विवेक पाटील, शिक्षणमंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, प्रवक्ते शशिकांत बांदोडकर, जिल्हा चिटणीस मुन्नाभाई बेग, पीआरपीचे प्रदेश सचिव नरेंद्र गायकवाड, भाजपचे नेते बाळासाहेब पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते सुनिल घरत, नगरपालिकेतील कॉंग्रेसचे गटनेते अनिल भगत, बांधकाम सभापती राजू सोनी, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक गणेश पाटील, माजी बांधकाम सभापती तथा नगरसेवक मनोहर म्हात्रे, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, अनुसुचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बिनेदार, नगरसेवक लतीफ शेख, गणपत म्हात्रे, रमेश गुडेकर, शिवदास कांबळे, प्रितम म्हात्रे, संदीप पाटील, नगरसेविका नाज हाफीज, सिता पाटील, निर्मला म्हात्रे, संगिता कांडपाल, स्मिता पाटील, प्रमिला कुरघोडे, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, नलिनी शेलार, ज्येष्ठ कार्यकर्ते रमेश जानेरकर, बबन जगनाडे, सुधीर मोरे, नितीन भोईर, भगवान बडगुजर, अशोक नाईक, प्रविण खंडागळे, राज सदावर्ते, महेश साळुंखे, सागर बहिरा, सुधाकर लाड, गणेश वाघिलकर, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, जिल्हा कॉंग्रेसच्या महिला उपाध्यक्ष रेश्मा सुंबे, मनिषा चिले, सरिता पाटणकर यांच्यासह विविध विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, संस्था-संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठया संख्येने सहभागी झाले होते.

या सोहळयात आयोजित करण्यात आलेल्या चित्ररथ, लेझीम व पोवाडा स्पर्धेत विविध विद्यालय व संस्थानी सहभाग घेवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.चित्ररथ स्पर्धेत शिक्षण मंडळाने २५ हजार रूपयांचे प्रथम कमांकाचे पारितोषिक, बार्न्स स्कूलने २० हजार रूपयांचे व्दितीय कमांकाचे, के.व्ही.कन्या विद्यालयाने १५ हजार रूपयांचे तृतीय कमांकाचे तर सीकेटी माध्यमिक विद्यालयाने उत्तेजनार्थ बक्षिस पटकाविले. लेझीम स्पर्धेतील शालेय गटात नगरपालिकेच्या हुतात्मा हिरवे गुरूजी शाळेने १० हजार रूपयांचे प्रथम कमांकाचे पारितोषिक, गणेश मंदिर धाकटा खांदा शाळेने ०८ हजार रूपयांचे व्दितीय पारितोषिक, के.व्ही.कन्या विद्यालयाने ५५०० रूपयांचे तृतीय तर सीकेटी विद्यालयाने ३ हजार रूपयांचे उत्तेजनार्थ पटकाविले. खुल्या गटात कैलासपती यांनी १० हजार रूपयांचे प्रथम तर गिरे टोळीने ०८ हजार रूपयांचे व्दितीय कमांक पटकाविले. पोवाडा गायन स्पर्धेत व्हि.के.हायस्कूल, पनवेल नगरपरिषद कन्या शाळा व सरस्वती मंदिर शाळा यांनी पारितोषिक पटकाविले. खुल्या गटात शाहिर वैभव घरत यांनी ०५ हजार रूपयांचे प्रथम, कन्या शाळा शिक्षिकांनी व्दितीय, तृतीय कमांक शाहिर बलभीम भोंडवे तर अनिल पवार व नामदेव म्हात्रे यांनी उत्तेजनार्थ बक्षिस मिळविले. टपाल नाका येथील शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळा येथे झालेल्या मिरवणूकीच्या सांगता समारंभात उपस्थित आमदार प्रशांत ठाकूर व इतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले.त्यानंतर नगराध्यक्षा चारूशिला घरत यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने मिरवणूकीत सहभागी झालेल्या नागरिकांना बिस्कीट व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

### पनवेल कॉंग्रेसच्यावतीने शिवरायांना अभिवादन

पनवेल तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्या मध्यवर्ती कार्यालयातही शिवजयंती मोठया उत्साहात साजरी झाली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष आर.सी.घरत, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पमाला अर्पून अभिवादन केले.